RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक १६] मंगळवार, जुलै ९, २०१९/आषाढ १८, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.—** महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. | पृष्ठे १-४ |

दिनांक ८ जुलै २०१९ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ जुलै २०१९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ६ मार्च २०१९ रोजी महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९, हा प्रख्यापित केला होता ;

२०१९ चा महा. अध्या ६.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०१९, असे म्हणावे.

(२) तो, या अधिनियमात, अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, दिनांक ६ मार्च २०१९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.**

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) मध्ये, “ एक हजार रुपये ” या मजकुराऐवजी, “ जर विवरण दाखल करण्यासाठी विहित मुदत संपल्यानंतर तीस दिवसांच्या कालावधीच्या आत असे विवरण दाखल करीत असल्यास, दोनशे रुपये आणि इतर कोणत्याही बाबतीत, एक हजार रुपये ” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७५ चा महा. १६.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याची सुधारणा.**

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १० ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे ज्याचा निर्देश “ मूल्यवर्धित कर अधिनियम” असा करण्यात आला आहे) याच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि तो, दिनांक १ जुलै २०१७ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :— २००५ चा महा. ९.

“ परंतु, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ अन्वये नियुक्त केलेले अधिकारी हे, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नियुक्त केलेले अधिकारी असल्याचे मानण्यात येईल.”. २०१७ चा महा. ४३.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**४.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २४ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येईल :—

“ (२क) जेथे कोणत्याही व्यापा-याने विवरणामध्ये वजावटीचा दावा केला असेल परंतु ज्या कोणत्याही कारणास्तव कलम २३ अन्वये निर्धारण आदेश काढण्यापूर्वी अशी वजावटीची निश्चिती झाली नसेल तेव्हा, ज्यावर्षी उक्त आदेश बजावण्यात आला असेल ते वित्तीय वर्ष संपल्यापासून दोन वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, त्यास,

(क) जर त्याने उक्त आदेशाविरूद्ध अपील दाखल केले नसेल तर, किंवा

(ख) जर उक्त आदेशाविरूद्ध त्याने अपील दाखल केले असेल, आणि संपूर्ण अपील मागे घेतली असेल तर,

उक्त वजावटीच्या निश्चितीसाठी आणि त्याकरिता त्याबाबतचा आवश्यक तो पुरावा सादर करण्याच्या स्थितीत आहे या कारणावरून त्या आदेशाच्या दुरुस्तीसाठी, आयुक्ताकडे अर्ज करता येईल, आणि त्यानंतर आयुक्त, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील आणि अर्जदाराचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर, वजावटी बाबतचा दावा निश्चित करण्यात आल्यास, त्या निर्धारण आदेशात दुरूस्ती करील :

परंतु, अर्जदाराने वरील खंड (ख) नुसार या पोट-कलमान्वये अर्ज दाखल केला असल्यास, जे अपील मागे घेण्यापूर्वी या अगोदर थकीत होती अशी देय रक्कम, असा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत वसूल करण्यात येणार नाही.”.

**५.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २६ मध्ये, पोट-कलम (६ग) नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल आणि ते दिनांक १५ एप्रिल २०१७ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल:— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २६ ची सुधारणा.

" **स्पष्टीकरण.**—शंका निरसनार्थ, याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, पोट-कलमे (६क), (६ख) आणि (६ग) यांच्या तरतुदी ह्या, ज्या आदेशाविरूद्ध अपील करण्यात आले असेल तो आदेश ज्या कालावधीशी संबंधित असेल तो कालावधी किंवा ज्या दिनांकास अशा आदेशाबाबत कार्यवाही सुरू करण्यात आली असेल तो दिनांक विचारात न घेता, त्या पोट-कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा सर्व आदेशांवरील कोणत्याही अपिलास लागू होतील.".

**६.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची क मध्ये, नोंद २ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची क ची सुधारणा.

| | | | |
|---|---|---|---|
| "३ | १ एप्रिल २०१७ ते १५ सप्टेंबर २०१७ या कालावधी दरम्यान गॅस ऑथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेड यांच्याकडून रत्नागिरी गॅस व पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांना केली जाणारी देशांतर्गत नैसर्गिक वायुची किंवा पुनर्रुपांतरित द्रवरुप नैसर्गिक वायुची (RLNG) विक्री. | १. खरेदी करणा-या व्यापा-याने, देशांतर्गत नैसर्गिक वायुचा किंवा पुनर्रुपांतरित द्रवरुप नैसर्गिक वायुचा (RLNG) वापर, भारतीय रेल्वेला पुरवठा करण्याकरिता वीज निर्मिती करण्यासाठी केला असेल.<br>२. मागणीदार व्यापारी, पश्चिम प्रादेशिक विद्युत समिती यांच्याकडून रत्नागिरी गॅस व पॉवर प्रायव्हेट लिमिटेड यांनी प्राप्त केलेले, ऊर्जा लेखा विवरणपत्र (एनर्जी अकाऊंट स्टेटमेंट) सादर करील. | निरंक.". |

प्रकरण चार

## विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

२०१९ चा महा. १४. **७.** (१) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र कर विषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०१९ (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, याच्या तरतुदींन्वये कोणत्याही व्यापा-याने किंवा व्यक्तीने केलेल्या विक्री किंवा खरेदीबाबत केलेले कराचे कोणतेही निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली, अथवा असे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यासंबंधात केलेली किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही किंवा गोष्ट ही जणू काही असे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली अथवा अशी कार्यवाही किंवा गोष्ट यांसंबंधीच्या तरतुदी संबंधित दिनांकास मूल्यवर्धित कर अधिनियमान्वये अंमलात होत्या असे समजून, वैध असेल आणि ती नेहमीकरिता वैध व प्रभावी असल्याचे मानण्यात येईल, आणि तद्‌नुसार,— विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

(क) अशा कोणत्याही कराबाबतचे निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिका-याने किंवा इतर कोणत्याही प्राधिका-याने केलेली किंवा करण्यात आलेली सर्व कार्ये, कार्यवाही किंवा गोष्टी ह्या, सर्व प्रयोजनांसाठी, कायद्यानुसार करण्यात आल्याचे आणि त्या नेहमीच तशा प्रकारे केलेल्या किंवा करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) अशा रीतीने भरण्यात आलेल्या कोणत्याही कराच्या परताव्यासाठी कोणताही दावा, अपील, अर्ज किंवा इतर कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणतेही न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी यांच्यापुढे दाखल करण्यात येणार नाही किंवा ती चालू ठेवण्यात येणार नाही ; आणि

(ग) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, अधिकारी किंवा इतर प्राधिकारी, अशा कोणत्याही कराच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, अंमलात आणणार नाही.

(२) शंका निरसनासाठी, याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे एखाद्या व्यक्तीला,—

(क) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या तरतुदींनुसार, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कराचे कोणतेही निर्धारण, अपील, पुनर्विलोकन, आकारणी किंवा वसुली यांच्या संबंधात हरकत घेण्यास, किंवा

(ख) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मूल्यवर्धित कर अधिनियम याअन्वये कराच्या रूपाने तिच्याकडून येणे असलेल्या रकमेपेक्षा अधिक असणारी, तिने भरलेल्या कोणत्याही कराची रक्कम परत मिळण्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो असा त्याचा अर्थ लावण्यात येणार नाही.

## प्रकरण पाच

## संकिर्ण

सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

८. (१) महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०१९, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०१९ चा महा. अध्या. ६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबंधित करविषयक कायद्यांन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या संबंधित करविषयक कायद्यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.